ISSN 2230-7850 Impact Factor : 4.1625(UIF) Volume - 6 | Issue - 8 | September - 2016

Indian Streams Research Journal

# मुद्रा कर्ज योजनेचे विश्लेषणात्मक अध्ययन

प्रा. धंनजय काळे
अर्थशास्त्र विभाग,
श्री शिवाजी महाविद्यालय अकोला.

## प्रस्तावना

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लहान कुटीर उद्योगांकरिता मुद्रा बँक योजना सुरु केली. मुद्रा योजना लहान व्यापारांना मदत देण्याकरिता सुरू करण्यात आली आहे. तत्कालीन वित्त मंत्री अरुण जेटली यांनी 2015 च्या बजेट अंतर्गत या मुद्रा बँक योजनेत 20,000 कोटी रुपयांचा निधी आणि 3,000 कोटी रुपये क्रेडीट ची घोषणा केली होती. अरुण जेटलींच्या मते गरजू लोकांच्या वित्तीय मदतीकरिता मुद्रा योजना एक उपयुक्त साधन आहे.

## मुद्रा बँक योजनेचे मुख्य उद्देश खालीलप्रमाणे आहेत.

- या योजनेमुळे व्यापारांची व लघुउद्योजकांची सावकारी पाशातून मुक्तता होईल. या योजनेअतंर्गत कुटीर उद्योजक सोप्या पद्धतीने बँकेकडून कर्ज घेवू शकते.
- मुद्रा योजनेअतंर्गत उद्योगासंबंधी प्रशिक्षण आणि व्यवसायातील लहान–सहान बाबींसंबंधी माहिती दिली जाईल जेणेकरून उद्योजक आपला व्यवसाय वाढवू शकतील.




- मोठ्या उद्योगांमुळे देशातील सव्वा कोटी जनतेला रोजगार प्राप्त होतो तथापि लघु आणि कुटीर उद्योगांमुळे देशातील बारा कोटी जनतेला रोजगार प्राप्त होतो जर अशा लघुउद्योगांना आर्थिक मदत दिली तर ते प्रगती करतील ज्यामुळे रोजगाराच्या संधी वाढतील.

मुद्रा योजनेचा अर्थ (MUDRA) MICRO UNITS DEVELOPMENT REFINANCE AGENCY आहे. या योजनेचा मुख्य बिंदू कुटीर उद्योजकांना भांडवलाची मदत करणे हे आहे.

## योजनेची स्थापना

मुद्रा बँक योजना 8 एप्रिल 2015 रोजी घोषित करण्यात आली, मुद्रा बँक ही वैधानिक अधिनियमाअंतर्गत स्थापित करण्यात आली. ज्यात कुटीर उद्योगांच्या विकासासाची जबाबदारी पंतप्रधान मुद्रा योजना बँकेकडे सोपविण्यात आली.

## मुद्रा बँक योजनेचे लक्ष

लघु कुटीर उद्योगांना बँकेद्वारे सहज आर्थिक मदत मिळत नाही. तसेच ते बँकांच्या नियमांना पूर्ण देखील करू शकत नाही यामुळे हे उद्योग प्रगती करण्यात असमर्थ आहेत. याकरिताच मुद्रा बँक योजना सुरु करण्यात आली जीचे मुख्य लक्ष युवा आणि शिक्षित तरुणांच्या कौशल्याला मजबुत आधार देणे तसेच महिलांना सक्षम बनविणे हे आहे.

## मुद्रा बँक योजनेकरिता पातत्रा

मुद्रा बँक योजनेअतंर्गत तो प्रत्येक व्यक्ती ज्याच्या नावे एखादे कुटीर उद्योग किंवा एखाद्या सोबत भागीदारीचे योग्य दस्ताऐवज किंवा एखादा लहान युनिट आहे ते या मुद्रा बँक योजनेअतंर्गत कर्ज घेवू शकतात. मुद्रा बँक योजनेअंतर्गत कर्जाचे प्रावधान मुद्रा बँक योजनेअतंर्गत लघु उद्योग आणि व्यापाऱ्यांना कर्जाची सुविधा तीन चरणात देण्यात येते.

**शिशू कर्ज योजना :** कुटीर उद्योगाच्या सुरुवातीच्या वेळी मुद्रा बँकेअंतर्गत रु. 50,000 कर्जाचे प्रावधान आहे.

**किशोर कर्ज योजना :** या योजनेअतंर्गत रू. 50,000 ते 5,00,000 पर्यंत कर्ज मिळू शकते.

**तरुण कर्ज योजना :** या योजनेअतंर्गत रु. 5,00,000 ते 10,000,00 पर्यंत कर्ज घेता येऊ शकते.

## मुद्रा बँक योजनेचे लाभ

1) या योजनेमुळे लहान व्यापारांचा आत्मविश्वास वाढेल ज्यामुळे देशाचा आर्थिक विकास होईल.
2) या योजनेमुळे शिक्षित तरुणांना रोजगार प्राप्त होईल आणि त्यांचे कौशल्य विकसित होईल.
3) मोठ्याा उद्योगांमुळे देशातील केवळ सव्वा कोटी जनतेलाच रोजगार प्राप्त होतो. याउलट कुटीर उद्योग देशातील बारा कोटी जनतेला रोजगार मिळवून देतात. या उद्योगांना प्रोत्साहन दिल्यास देशातील पैसा देशातच राहिल आणि आर्थिक विकास होईल.
4) लहान व्यापाऱ्यांच्या आत्मविश्वासात वाढ होईल. ज्यामुळे प्रतियोगितेची भावना उत्पन्न होईल. जी त्यांच्या प्रगतीत साहय्यक राहिल.
5) देशाचा विकास केवळ श्रीमंताच्या विकासामुळे होत नाही तर यात गरिबांची देखील भागीदारी असते. या दिशेने मुद्रा बँक योजना एक महत्त्वपूर्ण निर्णय आहे.

## मुद्रा योजनेची वैशिष्टये :

1) देशातील 5.77 कोटी उद्योजकांना वित्तसाहाय्य
2) वार्षिक 7 टक्के दराने 10 लाख रुपयांपर्यंत अर्थपुरवठा
3) 20,000 कोटींचे भक्कम सरकारचे भांडवली पाठबळ
4) सिडबीची ही उपकंपनी रिझर्व्ह बँकेच्या अखत्यारीत येणार
5) सूक्ष्म वित्त संस्थेव्यतिरिक्त बँकेकरिता स्वतत्रं विधेयक

लघु उद्योगांसाठी अर्थसंकल्पात प्रस्तावित करण्यात आलेल्या मुद्रा बँकेला पंतप्रधानांच्या जन धन योजनेला जोडण्यात आले असून या योजनेचे बँकेत रूपांतर करण्यासाठी येत्या वर्षभरात संसदेत विधेयक सादर केले जाणार आहे. वार्षिक 7 टक्के दराने ही वित्तसंस्था देशातील छोट्याा उद्योजकांना 10 लाख रुपयांपर्यंत वित्तपुरवठा करेल. 20 हजार कोटी रुपयांची ही योजना देशातील 577 कोटी उद्योजकांना वित्तीय सहकार्य करेल. देशातील छोट्याा उद्योजकांसाठी एखादी बँक असावी, असे 2015–16 च्या अर्थसंकल्पात केंद्रिय अर्थमंत्री अरुण जेटली यांनी प्रस्तावित केले होते. यानुसार मुद्रा योजनेचे उद्‌घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते नवी दिल्लीत झाले. या वेळी रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर डॉ. रघुराम राजन हेही उपस्थित होते. पंतप्रधान मुद्रा योजनेचे याबाबतचे विधेयक हे स्वतंत्र सूक्ष्म वित्त विधेयक नाही, दोन्ही विधेयकांचे एकत्रीकरण न करता सूक्ष्म वित्त विधेयकातील काही तरतुदी या मुद्रा बँक विधेयकात अंतर्भूत करण्यात आल्या. देशातील 5.77 कोटी छोट्याा उद्योजकांच्या वित्त संस्था उभारणीस हे विधेयक पूरक ठरेल. यामुळे निर्मिती, व्यापार आणि सेवा क्षेत्रातील लघु उद्योगांना वित्तपुरवठा करता येणे शक्य होईल. सूक्ष्म वित्त संस्था म्हणूनच तिचे नियमन होईल. 'सिडबी'ची उप कंपनी या नात्याने मुद्रा बँक ही रिझर्व्ह बँकेकडे बिगर बँकिगं वित्तसंस्था म्हणून नोंदणीकृत करण्यात आली आणि रिझर्व्ह बँकेच्या नियत्रंणाखाली ती काम करत आहे. मुद्रा योजनेवर नाबार्डचे मुख्य व्यवस्थापक जिजी मेनन यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून काही काळ काम पाहीले. शिशू, किशोर, तरूण या नावाच्या योजनाही मुद्रा अंतर्गत सादर करण्यात आल्या असून 50 हजार, 5 लाख व 10 लाख रुपये अशा टप्प्यांपर्यंत कर्जवितरण होईल. योजनेसाठी शासनाद्वारे 3,000 कोटी

## संदर्भ ग्रंथसूची

1) डॉ. आगलावे प्रदीप संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे विद्या प्रकाशन,नागपूर 1 जाने.2000
2) डॉ.भांडारकर पु.ल. सामाजिक संशोधन पद्धती महाराष्ट्र विद्यापीठ ग्रथनिर्मीत मंडळ,नागपुर. तृतीय आवृत्ती 1987
3) डॉ.संत दु.का. संशोधन पद्धती, प्रक्रिया व अंतरंग पुणे विद्यार्थीगृह प्रकाशन पुणे द्वितीय आवृत्ती जुलै – 1988
4) MUDRA, Annual Report 2015- 2016)